स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावकक्र. : व.वि.श.म./**
**दिनांक :**

वसई विरार महानगरपालिकेमार्फत मूर्तीकारांना विनामुल्य शाडूच्या मातीचे वाटप

वसई विरार शहर महानगरपालिके मार्फत दरवर्षी पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. विशेषतः मूर्ती विसर्जनासाठी कृत्रीम तलाव, फिरते हौद उपलब्ध करून देण्याबरोबरच विसर्जनाच्या ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र, आरती स्थळे, निर्माल्य कलश, वैद्यकीय मदत कक्ष, जीव रक्षकांची व्यवस्था इ.अनेक व्यवस्था महापालिकेमार्फत गणेशोत्सवात करण्यात येते.
याचबरोबर पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणेच्या उद्देशाने महानगरपालिकेने शहरातील मूर्तीकारांना पीओपी मूर्तींची निर्मिती कमी करून शाडूच्या मातीच्या मूर्तींची निर्मिती जास्तीत जास्त प्रमाणात करण्याचे आवाहन केले होते. यासाठी मूर्तीकारांना महानगरपालिकेमार्फत विनामुल्य शाडूची माती पुरविण्याचे व ज्या मूर्तीकारांना शाडूची मातीची आवश्यकता असेल त्यांनी त्याबाबत तसे मागणीपत्र देण्याचे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात आले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत शहरातील वसई विरार मूर्तिकार संघटना मार्फत महानगरपालिकेला शाडूची माती मिळणेबाबत मागणीपत्र प्राप्त झाले होते. आज दि.०४ ऑगस्ट रोजी महानगरपालिकेमार्फत मूर्तीकारांना विनामुल्य शाडूच्या मातीचे वाटप करण्यात आले. प्रत्येक मुर्तीकारास ४० गोणी यानुसार २५ मूर्तीकारांना एकूण १००० शाडूच्या मातीच्या गोणींचे विनामुल्य वाटप करण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या या स्तुत्य उपक्रमाबाबत मूर्तीकारांनी महानगरपालिकेचे आभार मानले. यावेळी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त मा.श्री.दिपक सावंत, उप-आयुक्त मा.श्री.अजित मुठे, मूर्तिकार, पत्रकार बंधू व महानगरपालिका कर्मचारी उपस्थित होते.
जास्तीत जास्त नागरिकांनी शाडूच्या मातीची श्रींची मूर्ती स्थापन करून पर्यावरण संवर्धनास हातभार लावावा व महानगरपालीकेच्या पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करणेच्या या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद द्यावा असे आवाहन मा.अतिरिक्त आयुक्त श्री.दीपक सावंत यांनी यावेळी केले.

पर्यावरण विभाग

वसई विरार शहर महानगरपालिका